**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ०५/२०१८ मध्ये निशाणी ८५ वरील आदेश</u>**

०१. सदरचा अर्ज हा प्रतिदाव्यातील वादी यांनी दाखल करुन प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे. वादीने मुळ दावा हा मालकी जाहीर होऊन कामचा मनाईहुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या पूर्वीच्या विधीज्ञांकडून दाव्यामध्ये खरेदी खत क्र.१७३४/२०१४ हे रद्द मालकी जाहीर करणेबाबत मजकुर नमूद करणे गरजेचे होते. त्यामुळे प्रतिदाव्याच्या शिर्षकामध्ये, तरी विनंती की व परिच्छेद क्र.१४ व १८ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी याकरीता सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे. सदर अर्जावर मुळ दाव्यातील वादी यांना नोटीस काढण्यात आली होती. परंतु मुळ दाव्यातील वादी हे न्यायालयासमक्ष हजर राहिले नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विना म्हणणे चालविण्यात आला.

०२. अर्ज व दाव्यामधील दस्ताऐवजांचे अवलोकन केले. वादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुद्ध विनायुक्तीवाद चालवीण्यात येतो.

०३. वादीने सदरचा दावा हा मालकी जाहीर होऊन मनाईहुकुम मिळणेकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या प्रतिदाव्याच्या शिर्षकामध्ये, तरी विनंती की मध्ये व परिच्छेद क्र.१४ व १८ मध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. वादीच्या दाव्यात खरेदी खत क्र.१७३४/२०१४ हे रद्द करुन मालकी जाहीर करणेबाबत मजकुर नमूद करणे गरजेचे होते. त्यामुळे सदर दुरुस्तीची परवानगी मागितली आहे. प्रतिदाव्यातील वादी यांचा दावा दुरुस्ती अर्ज पाहिला असता वादीने न्यायालयाकडे जी दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे, ती सदर दाव्याशी निगडीत आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ

अर्जासोबत स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट, जर वादीची विनंती नामंजूर केली, तर वादीला दाव्याव्यतिरीक्त इतर कोणताही अधिकार राहणार नाही व त्यासाठी वादीला नवीन दावा किंवा अर्ज दाखल करावा लागू शकतो. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र ठरतो. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

०१. निशाणी ८५ वरील वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिदाव्यातील वादीने मागणीप्रमाणे पुढील तारखेला प्रतिदाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्तीची प्रत दाव्यात दाखल करावी.

०३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.10 18:10:29 +0530

रेणापुर (डि.एम.गित्ते)

दिनांक १०.०७.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रेणापूर.